23-03-2025-Dai-03new_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/22/2025 11:04 PM Page 1



# महिलांच्या राजकीय आरक्षणासाठी काँग्रेस छेडणार आंदोलन

## मुख्यमंत्री आणि विधानसभेवर घेराव : अलका लांबा यांची माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २२ :** देशभरात महिलांसाठी राजकीय आरक्षणाची मागणी अधिक तीव्र करण्यासाठी काँग्रेस पक्षातर्फे विविध राज्यांत आंदोलन छेडले जाणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर गोव्यातही अखिल भारतीय महिला काँग्रेसतर्फे मुख्यमंत्री आणि विधानसभेवर घेराव आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा यांनी दिली.

शनिवारी काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी प्रदेश महिला काँग्रेसच्या नव्या अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप उपस्थित होत्या. राज्यात महिलांवरील अत्याचारांमध्ये वाढ झाली आहे. हे सरकार महिलांना सुरक्षितता प्रदान करण्यात अपयशी ठरले आहे. परिणामी, फक्त स्थानिक महिलांच्याच नव्हे, तर पर्यटक म्हणून येणाऱ्या परदेशी महिलांच्याही सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, असे लांबा यांनी स्पष्ट केले.

गोव्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के महिलांना संधी दिली जाणार असल्याचे लांबा यांनी सांगितले. केंद्र सरकारने ३३ टक्के महिला आरक्षण विधेयक मंजूर केले असले तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही. काँग्रेस पक्षाने संसदीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दिल्लीत आंदोलन करून या विधेयकाच्या त्वरित अंमलबजावणीची मागणी केली होती.

२०२७ मध्ये गोव्यातील विधानसभा निवडणुकीतही ३३ टक्के महिलांना संधी मिळावी यासाठी दबाव टाकला जाणार आहे. काँग्रेस पक्ष ४० महिलांना निवडणुकीसाठी सक्षमपणे उभे करण्यासाठी तयारी करत आहे. कोणत्या महिला निवडणूक लढवू शकतात आणि विजय मिळवू शकतात, याचा आढावा घेतला जात आहे, असे लांबा यांनी स्पष्ट केले.

लांबा यांनी गोवा सरकारवर टीका करताना म्हटले की, 'बेटी बचाव' योजनेसाठी मिळणारा निधी सरकार जाहिरातींवर खर्च करत आहे. हा निधी महिला आणि युवतींच्या सुरक्षेसाठी वापरणे अधिक गरजेचे आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी काँग्रेस पक्षाकडून कोणते उपाय करण्यात येणार आहेत, यासंदर्भातही त्यांनी माहिती दिली. महिला अत्याचार, बलात्कार, अपहरण यांसारख्या घटनांवर भाजप महिला मोर्चा निष्क्रीय आहे. महिलांचे प्रश्न सोडविण्याऐवजी केवळ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून ते हाताळले जात असल्याचे चित्र आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

महिला काँग्रेसच्या आगामी कार्यपद्धतीबाबत बोलताना प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रतीक्षा खलप यांनी सांगितले की, यापूर्वी संघटनात्मक नेमणुकीतील विलंबामुळे महिला काँग्रेसची आंदोलने काही काळ थांबली होती. मात्र, आता महिलांना मोठ्या प्रमाणावर संघटित करून त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उतरवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम हाती घेतले आहे. गोव्यात महिलांच्या सुरक्षिततेसाठी सरकार अपयशी ठरले असल्याचा पुनरुच्चार करत काँग्रेस महिलांच्या हक्कांसाठी लढा उभारणार असल्याचे लांबा यांनी स्पष्ट केले.

# गनपावडर स्टोरेज युनिटचे परवाने निलंबीत

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २२ :** नाकेरी–बेतुल येथील ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या गनपावडर स्टोरेज युनिटमध्ये गुरुवारी रात्री उशिरा लागलेल्या आगीच्या घटनेनंतर, पेट्रोलियम अँड एक्सप्लोझिव्हज सेफ्टी ऑर्गनायझेशन (पीईएसओ) ने गनपावडर साठवण आणि वाहतुकीसंबंधी परवाने तात्काळ निलंबित केले आहेत.

भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या पीईएसओच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी घटनास्थळाची पाहणी केल्याचे वृत्त आहे. पीईएसओने स्पष्ट केले की, हा अपघात स्फोटके नियम, २००८च्या नियम ११८ (२)(ळळ) आणि १३१ चे उल्लंघन करतो. तसेच, सदर परिसर सध्या सुरक्षित नसल्याने त्याचा वापर करणे शक्य नाही.

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी संस्थेला सादर केलेल्या अहवालाच्या आधारे पीईएसओ ने ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू–कर्नाटक यांना दिलेले परवाने तात्पुरते निलंबित केले आहेत. पीईएसओचे संयुक्त मुख्य नियंत्रक आर. रावत यांनी कंपनीला जारी केलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, एक्सप्लोझिव्हज कायदा, १८८४च्या कलम ६(ई) आणि स्फोटके नियम, २००८च्या नियम ११८(५) अंतर्गत कंपनीचा वाहतूक परवाना देखील निलंबित करण्यात आला आहे. कंपनीला जारी करण्यात आलेल्या नोटिशीत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत की, २१ दिवसांच्या आत परवाना का रद्द करू नये, याबाबत खुलासा करावा. याशिवाय, कंपनीने नियम ११९ अंतर्गत स्फोटक पदार्थांची विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेचे पालन करावे आणि जर अपील करायचे असल्यास नियम १२१ अंतर्गत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी.

गुरुवारी रात्रीच्या दुर्घटनेनंतर दक्षिण गोव्याचे जिल्हाधिकारी एग्ना क्लीटसयांनी ह्यूजेस प्रिसिजन मॅगझिन क्रमांक १ (जुने), नाकेरी–केपे या ठिकाणी लोकांना प्रवेशबंदीचा आदेश दिला आहे. बीएनएस, २०२३च्या कलम १६३ अंतर्गत हा आदेश तात्काळ लागू करण्यात आला असून, ८०० मीटर त्रिज्येतील परिसरात प्रवेशास मनाई करण्यात आली आहे.

कुंकळ्ळी पोलिसांनी सादर केलेल्या अहवालानुसार हा आदेश जारी करण्यात आला असून, अहवालात नमूद केल्याप्रमाणे ह्यूजेस प्रिसिजनच्या मॅगझिन क्रमांक १ मध्ये आग लागली होती. कुंकळ्ळीअग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी वेळीच पोहोचून आग आटोक्यात आणली. दुर्घटनेत एकूण १४.५ टन गनपावडर (प्रोपेलंट) नष्ट झाले असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. ही कंपनी वेर्णा येथे स्थित असून, नाकेरी–बेतुल येथील मॅगझिनमध्ये लहान कॅलिबरच्या दारूगोळ्यासाठी लागणाऱ्या गनपावडरचा साठा ठेवला जात होता.

जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे सांगितले की, ही घटना परिसरातील सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करणारी आहे. यामुळे शांतता आणि सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पीईएसओच्या पुढील परवानगीशिवाय घटनास्थळी कोणालाही जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

मानवी जीवन आणि सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत,असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर बीएनएस, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कारवाई आणि शिक्षेस पात्र ठरवले जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.



# बाणावलीतील झऱ्याचे १५ वर्षांनंतर पुनरुज्जीवन

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ झरा पुन्हा प्रवाहित झाल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

**मडगाव, दि. २२ :** बाणावली येथे एका दीर्घकाळ दुर्लक्षित नैसर्गिक झऱ्याचे पुनरुज्जीवन करण्यात यश आले असून, यासाठी स्थानिक रहिवासी आणि बाणावली पंचायतीच्या सहकार्याने पुढाकार घेतला. तब्बल १५ वर्षांपासून कोरडा पडलेला हा झरा पुन्हा प्रवाहित झाल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

नैसर्गिकतेला प्राधान्य देत, पुनर्संचयितीकरणाच्या प्रक्रियेत आधुनिक बांधकाम पद्धतीऐवजी पारंपरिक दगडी बांधकामाचा अवलंब करण्यात आला. पर्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवून हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला असून, यामुळे झऱ्याचा पारंपरिक स्वरूप टिकवून ठेवता आला आहे.

झऱ्याच्या पुनरुज्जीवनाने अनेक जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. ज्येष्ठ नागरिक मिंगेल फर्नांडिस यांनी आपल्या बालपणीचे दिवसआठवताना सांगितले की, आम्ही येथे मासेमारी करत असू. गावकऱ्यांसाठी हे पाणी केवळ आवश्यक नाही, तर त्यांच्या जीवनशैलीचा एक भाग होते.शेतकरी आणि स्थानिक रहिवासी देखील पिण्याच्या आणि शेतीसाठी झऱ्यावर अवलंबून होते, मात्र दीर्घकाळ दुर्लक्षित राहिल्याने झऱ्याची स्थिती खालावली होती.

झऱ्याच्या पुनर्विकासासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी मोठे प्रयत्न केले. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रोक फर्नांडिस यांनी अनेक वर्षांपासून पंचायतीला यासंदर्भात पाठपुरावा करत होते. आज झऱ्यातून पाणी वाहताना पाहून अत्यंत आनंद होतो. पंचायतीला उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती केली आहे. याठिकाणी खाली उतरण्यासाठी पायऱ्या देखील बांधण्यात येतील. गावात असे अनेक झरे आहेत, जे कालांतराने बांधकामाच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेतअसे त्यांनी सांगितले.

बाणावली पंचायतीच्या सदस्या एल्झिना फर्नांडिस यांनी सांगितले की, झऱ्याच्या पुनरुज्जीवनासाठी आधीच ठराव मंजूर करण्यात आला असून, कामकाजावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. हा झरा गावासाठी महत्त्वाचा आहे. उर्वरित काम लवकरच पूर्ण करण्यात येईल,असे त्यांनी स्पष्ट केले.

या संपूर्ण प्रकल्पात महत्त्वाची भूमिका बजावणारे वॉरेन आलेमाव यांनी नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनावर भर दिला. आपली नैसर्गिक संसाधने म्हणजे आपला वारसा आहे. त्यांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. झऱ्यांचे पुनरुज्जीवन केवळ एक पर्यावरणपूरक उपक्रम नाही, तर आपल्या मुळांशी जोडण्याचा प्रयत्न आहे.

# भरपाई विलंबप्रकरणी अधिकाऱ्यांकडून व्याज वसूल करण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने शुक्रवारी सचिव (वित्त) यांनी दाखल केलेले विविध दिवाणी अर्ज फेटाळून लावले. तसेच, भूसंपादन प्रकरणात भरपाई रक्कम देण्यास झालेल्या विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांकडून पुढील सहा महिन्यांत ९.३६ लाख रुपयांचे व्याज वसूल करण्याचे निर्देश दिले.

डिचोली येथील रहिवासी ए. के. निग्याळे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने ३० एप्रिल २०२४ रोजी सचिव (वित्त) यांना पणजी येथील जिल्हा आणि सत्र न्यायालयासमोर या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने असेही स्पष्ट केले होते की जबाबदारी निश्चित झाल्यानंतर, संबंधित अधिकाऱ्यांकडून विलंबावरील व्याज सरकारने वसूल करावे.

या निर्देशांच्या अनुषंगाने सचिव (वित्त) यांनी चौकशी अहवाल सादर केला, ज्यामध्ये १३ जबाबदार अधिकाऱ्यांची नावे नमूद होती. या अहवालानुसार, एकूण व्याज ९,३६,७३४ रुपये असून, या अधिकाऱ्यांपैकी तीन जण सेवानिवृत्त झाले होते तर एक अधिकाऱ्याचा मृत्यू झाला होता.

सचिव (वित्त) यांनी न्यायालयात सादर केलेल्या याचिकेत, काही अधिकारी निवृत्त झाले असल्याने आणि प्रशासकीय तसेच कार्यात्मक अडचणीमुळे विलंब झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, न्यायालयाने हे कारण अमान्य करत स्पष्ट निर्देश दिले की, सरकारी यंत्रणेतील दिरंगाईचा फटका नागरिकांना बसू नये.

राज्य सरकारने २०१३ मध्ये तिलारी सिंचन प्रकल्पासाठी डिचोली मधील नरोआ येथे याचिकाकर्त्याची जमीन अधिग्रहित केली होती. मात्र, भरपाईच्या रकमेसंदर्भात वाद असल्याने हा प्रकरण जिल्हा न्यायालयात पाठवण्यात आला. तरीही, संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत कार्यवाही केली नाही, तसेच भरपाईच्या रकमेबाबत न्यायालयात कोणतीही स्पष्टता दिली नाही.

न्यायालयाने सरकारला चार महिन्यांत संदर्भ नोंदवण्याचे आणि चौकशी करून विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व ॲड. ओंकार कुलकर्णी यांनी केले.

# जागतिक जल दिनानिमित्त जलसंवर्धन जनजागृती उपक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड






**मडगाव, दि. २२ :** जागतिक जल दिनाचे औचित्य साधून गोव्यात विविध ठिकाणी जलसंवर्धन आणि पाण्याच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी विशेष जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या. ग्राहक हक्क संघटना गोवाकॅनने बेतालभाटी येथे जलसंवर्धनावर भर देत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले, तर चिंचिणी –देवसू ग्रामपंचायतीने पाणी गळती रोखण्यासाठी समुदाय–सहभाग उपक्रम राबविला.

गोवाकॅनच्या उपक्रमात बेतालभाटी, राय, नावेलि, दवरली, कुंकळ्ळी आणि पारोडा या सहा गावांतील ग्राहक मंच स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी स्वयंसेवकांनी फलक, झेंडे, बादल्या आणि भांडी घेऊन मोहिमेत भाग घेतला. मोहिमेच्या अंतर्गत बेतालभाटीच्या धोंडवाडा आणि नागवाडा भागातील निवासी विहिरींना भेटी देण्यात आल्या. स्वयंसेवकांनी घरमालकांशी संवाद साधत विहिरींच्या देखभालीबाबत आणि पाणी वापर धोरणांबाबत चर्चा केली.

गोवाकॅनचे समन्वयक रोलँड मार्टिन्स यांनी गोवा भूजल कायदा २००२ आणि त्यासोबतच्या २००३ च्या नियमांचे पालन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. विहिरींची नोंदणी बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जलसंपदा विभागाच्या नितळ गोंय, नितळ बायें या विहीर पुनरुज्जीवन योजनेचा लाभ घेण्याचा सल्ला दिला. त्यांनी ग्रामसभांमध्ये विहिरींच्या संरक्षणावरील चर्चा वाढवण्याचे आवाहन केले.

बेतालभाटीच्या उपसरपंच इल्मा डायस यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने ग्राम पाणी आणि स्वच्छता समित्या सक्रिय करण्याचे तसेच ग्रामविकास समितीमार्फत पाणी व्यवस्थापनावर चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिले. स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने पाणीविषयक आरोग्य समस्यांवर उपाय शोधण्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, चिंचिणी – देवसू ग्रामपंचायतीने पाण्याच्या गळतीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि पाणी संवर्धनाला चालना देण्यासाठी समुदाय–आधारित उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत ग्रामस्थांना सार्वजनिक नळांमधील गळतीची तक्रार संबंधित वॉर्ड सदस्यांकडे नोंदविण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे, जेणेकरून त्वरित दुरुस्ती करून पाणी वाचवता येईल. सरपंच फ्रँक व्हिएगास यांनी पाणी संवर्धनासाठी नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक थेंब अमूल्य आहे. हवामान बदलाचा थेट परिणाम पाण्याच्या उपलब्धतेवर होत आहे. आपण एकत्रित कृती करून गळती रोखल्यास मोठ्या प्रमाणावर पाणी वाचवता येईल आणि गावाच्या शाश्वत भविष्यास हातभार लावता येईल, असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक सहाय्यक संजय पागी यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना परिसरातील पाण्याची गळती रोखण्याच्या दृष्टीने हा प्रभावी उपक्रम असल्याचे सांगितले. गावकऱ्यांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, ग्रामपंचायतीला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. पाणी संवर्धनाच्या परिणामांवर लक्ष ठेवण्यासाठी पंचायतीने सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

या दोन्ही उपक्रमांमुळे पाण्याचे संवर्धन, सुयोग्य व्यवस्थापन आणि नागरिकांच्या सहभागाला चालना मिळत आहे. जागतिक जल दिनाच्या निमित्ताने राबविलेल्या या मोहिमा राज्यातील इतर गावांसाठीही दिशादर्शक ठरू शकतात.

Starting From 2nd April
GOA's Most Popular Exhibition
Grand Exhibition Cum Sale
2nd to 6th April
S.G.P.D.A GROUND, MARGAO.
10 a.m. to 8 p.m.
ENTRY FREE
9822034871, 9820135650.
Consumers Shoppee™
• Consumer • Interiors • Fashion

## निवडक

# मांद्रे नववर्ष स्वागत समितीच्या अध्यक्षपदी मुकुंद कायसुकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २२ :** मांद्रे नववर्ष गुढीपाडवा स्वागत समितीची बैठक होऊन यंदाच्या वर्षी, स्वागताध्यक्षपदी मुकुंद कायसूकर यांची निवड करण्यात आली. सदर उत्सव रविवार ३० रोजी सकाळी ६ वाजता श्री देव सप्तेश्वर भगवती पंचायतन देवस्थान प्रांगणात होणार आहे.यंदाचा नववर्ष साजरा करण्यासाठी वाड्यावाड्यावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून येते. यंदाच्या वर्षी स्वागताध्यक्ष मुकुंद कायसूकर, उपाध्यक्ष सुभाष पार्सेकर, प्रसाद शहापूरकर, केशव मांद्रेकर मंगेश नाईक, सचिव संजय नाईक सहसचिव गौरेश कोरगावकर, खजिनदार परेश सावंत, सहखजिनदार गोविंद आसगावकर, संयोजक महेश गोडकर संपर्कप्रमुख विनायक चारी, सह संपर्कप्रमुख सुहास गावडे महिला प्रमुख शिल्पा म्हामल, नेत्रा मांद्रेकर विणा म्हामल, सहप्रमुख तनवी केरकर, सुरेखा किनलेकर, युवा प्रमुख मितेश पार्सेकर, सहयुवाप्रमुख मनोज जोशी, गुढी पूजन व्यवस्था प्रमुख दिनेश मयेकर सह प्रमुख राजन मसुरकर गुरुदास गडेकर, सजावट समिती प्रमुख दीपेश हरमलकर, सहप्रमुख तीर्थराज म्हामल स्वप्निल बागकर, अर्जुन गोडकर, संकेत पुरखे, मनोज हडफडकर, कृष्णा गोडकर, निमंत्रण पत्रक प्रमुख उद्देश पेडणेकर, नारायण सावंत, विलास गोवेकर साऊंड सिस्टम प्रमुख विजेश मांजरेकर, सिद्धार्थ नाईक दीपक म्हामल, अमित पेडणेकर, प्रमोद मांद्रेकर, आसन व्यवस्था गोविंद आसगावकर, स्वागत कक्ष गिरिश सातार्डेकर, सुनील कोनाडकर, स्वागत तोरण कमानी प्रमुख प्रवीण किनलेकर, भगवान गडेकर, रमेश पोखरे, विजय नागवेकर, श्रीकांत पेडणेकर, उपप्रमुख तुळशीदास सावंत अर्जुन खरबे झिलू नाईक, ढोल ताशा प्रमुख संतोष बर्डे ,रमाकांत कशाळकर, उपप्रमुख चंद्रा सातोस्कर लाडू पुरखें, काशीराम साळगावकर ,आतषबाजी व्यवस्था प्रमुख रवी गोवेकर उपप्रमुख मुकुंद गोवेकर अरुण म्हामक,सुनील कोनाडकर, सूर्यकांत गडेकर, बाबू पूरखे, सुनील गो, प्रसाद व्यवस्था राजेश हडफडकर प्रेमानंद म्हामल अमर हडफडकर, ऋषल आस गावकर, राजन राऊळ,महिपाल हणजूणकर,मनोज हडफडकर ,विलास आसगावकर सूत्रसंचालक परेश हनुमंत नाईक, वाहन व्यवस्था प्रमुख ज्ञानेश्वर गावडे, हनुमंत शेटकर, समीर साळगावकर, प्रशांत हरमलकर, संदेश शिरसाठ, प्रचार व प्रसार प्रमुख यशवंत सावंत, प्रसाद शहापूरकर, देवस्थान संपर्कप्रमुख सिद्धारूट म्हामल, जगन्नाथ पार्सेकर मनोज मोरजकर, राजेश नाईक सुजय म्हामल व सम्राट सावंत यांची निवड करण्यात आली.

दरम्यान,सकाळी ६ वाजता स्वागत,प्रस्तावना, गुढीपुजन,स्वागत, सन्माननीय पाहुणे श्री दत्त पद्मनाभ पीठ संचालक श्रीराज शेलार तर प्रमुख पाहुणे हभप सुहासबुबा वझे यांचे अशिर्वाचन होईल. या समारंभास विशेष निमंत्रित सरपंच राजेश मांद्रेकर,देवस्थानचे अध्यक्ष हरी प्रभू,उपसरपंच तारा हडफडकर,पंच ॲड अमित सावंत, प्रशांत (बाळा) नाईक, महेश कोनाडकर, किरण सावंत, चेतना पेडणेकर, संपदा आजगावकर आदी उपस्थित राहणार आहेत. अशिर्वाचन नंतर वंदे मातरम् व नंतर पूर्ण गावात प्रभात फेरी होणार आहे. तरी ग्रामस्थ हिंदू प्रेमी ग्रामस्थांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष मुकुंद कायसुकर व संयोजक महेश गोडकर यांनी केले आहे.

---

# मांद्रे भंडारी समाजातर्फे उद्या करीयर विषयक मार्गदर्शन शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २२ :** पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजतर्फे 'युवकांना नागरी सेवेतील संधी' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम रविवार दि. २३ रोजी दुपारी २.४५ वाजता दीनदयाळ सभागृह, मांद्रे येथे आयोजित केल्याची माहिती भंडारी समाज अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी दिली. यावेळी सरचिटणीस दत्ताराम नाईक, मुख्य संयोजक रंजन म्हामल, अनिल म्हामल व प्रशांत हरमलकर उपस्थित होते. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. या कार्यशाळेत पुणे, चाणक्य आयएएस अकादमीचे मार्गदर्शक प्रा. डॉ. अमित मेढेकर उपस्थित राहणार आहेत. तसेच सोहळ्यास सरपंच राजेश मांद्रेकर प्रमुख पाहुणे नात्याने उपस्थित असतील.ह्या कार्यशाळेत नागरीसेवेतील संधी,परीक्षा संधी व वाटा, परीक्षेसाठी करावयाची तयारी यात यूपीएस सी, राज्य नागरी सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात येईल.ह्या कार्यशाळेत दहावी,बारावी किंवा पदवी, पदव्युत्तर, उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी किंवा ज्यांना नागरी सेवेत जाण्याची इच्छा आहे,त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. इश्चुक विद्यार्थ्यांनी अध्यक्ष शिवकुमार आरोलकर, रंजन म्हामल किंवा दत्ताराम नाईक यांच्याशी नावनोंदणी करावी. या सेमिनारसाठी प्रवेश शुल्क नाही. विद्यार्थ्यांनी २.४५ पर्यंत सभागृहात उपस्थित राहवे असे आवाहन अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी केले आहे.

---

# सावईवेरे येथील मदनंत क्रिकेट क्लबची २४ रोजी गंधपूजा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. २२ :** सावईवेरे येथील मदनंत क्रिकेट क्लबची गंधपूजा येत्या सोमवार दि. २४ रोजी येथील श्री अनंत देवस्थानात आयोजित करण्यात आली आहे. यानिमित्त रात्री ८ वाजता बाबुराव भांडीये व साथी यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर आरती व तीर्थप्रसाद होईल. तरी सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---



**पेडणे : हळर्णच्या सरपंचपदी रामचंद्र परब यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना आमदार प्रवीण आर्लेकर. सोबत उपस्थित उपसरपंच, पंच सदस्य व ग्रामस्थ.**

---

# हळर्णच्या सरपंचपदी रामचंद्र परब

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २२ :** हळर्ण पंचायतीच्या सरपंचपदी रामचंद्र परब यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच सिद्धी राऊळ यांनी सरपंच पदाचा राजीनामा अलिखित करारानुसार दिल्यानंतर रामचंद्र परब यांची निवड करण्यासाठी मंगळवारी पंचायत कार्यालयात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत सरपंच पदासाठी रामचंद्र परब यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी दिवा ठाकूर यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. रामचंद्र परब यांचे नाव महेश वर परब यांनी सुचवले तर त्याला अनुमोदन आरती राऊळ यांनी दिले. यावेळी पंच निवडीच्या बैठकीला उपसरपंच आरती राहुल पंच विनोद हरिजन, पंच सिद्धी राऊळ, पंच दिव्या नाईक, पंच शैलेश नाईक, पंच महेश्वर परब, पंच रामचंद्र परब हे सातही पंचायत सदस्य उपस्थित होते.

पेडणे मतदारसंघाचे आमदार प्रवीण आलेकर यांनी सरपंच रामचंद्र परब यांचे पुष्प उच्च देऊन त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सरपंच रामचंद्र परब म्हणाले की, पेडणेचे आमदार प्रवीण आलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन पंचायत क्षेत्राचा विकास करण्यात येणार आहे. सर्व पंच सदस्यांनी एकजुटीने आपणास बिनविरोध निवडून दिल्याबद्दल त्यांनी यावेळी पंचायत मंडळाचे तसेच आमदारांना धन्यवाद दिले.